




दैनिक

# आकर्षण

संपादक : विजय सांगळे








वर्ष ६ । अंक १७ । शनिवार ३ ऑक्टोबर २०२६ । पाने ४ मूल्य ₹ २ https://epaper.dainikaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322


# विशेष मोहिमेत ८ फरार व पाहिजे असलेल्या आरोपींचा लावला छडा





**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** राज्याचे अपर पोलीस महासंचालक यांच्या सूचनेनुसार राज्यभरात प्रलंबित गुन्ह्यांतील फरार आणि पाहिजे असलेल्या आरोपींचा शोध घेण्यासाठी १ ऑक्टोबर ते ३१ ऑक्टोबर या कालावधीत विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे. या अनुषंगाने अहिल्यानगर जिल्ह्यात पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या निर्देशानुसार स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने एकाच दिवसात तब्बल ८ आरोपींवर कायदेशीर कारवाई पूर्ण केली आहे.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांना या मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले आहेत. या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी पोलीस अंमलदारांचे एक विशेष पथक तयार केले. या पथकाने दिनांक २ ऑक्टोबर रोजी केलेल्या कारवाईत ४ आरोपींना प्रत्यक्ष पकडून पोलीस ठाण्यात हजर केले. यामध्ये नेवासा पोलीस ठाण्यातील कुणाल पवार, कोतवाली हद्दीतील शिवाजी साबळे व गणेश झेंडे आणि पारनेरमधील अनिल येणारे यांचा समावेश आहे. यासोबतच तोफखाना पोलीस ठाण्यातील तीन आरोपी अक्षय धनवे, ऋतीक गायकवाड आणि निखील साळवे यांना न्यायालयाने जामीन दिल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांचे जामीन आदेश पोलिसांत सादर करण्यात आले. तर, एमआयडीसी पोलीस ठाण्यातील फरार आरोपी संतोष सोनवणे याचा मृत्यू झाल्याचे तपासात उघडकीस आल्याने, त्याचे मृत्यू प्रमाणपत्र सादर करून त्याचे नाव रेकॉर्डवरून कमी करण्याची प्रक्रिया पार पडली.

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे, तसेच अंमलदार विष्णू भागवत, सागर ससाणे, रोहित येमुल, अतुल लोटके आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केली आहे.

## चार वर्षांपासून फरार असलेला आरोपी जेरबंद

**याच मोहिमे अंतर्गत कोतवाली पोलिसांनी चार वर्षांपासून फरार असलेल्या आरोपीला जेरबंद केले आहे ऑगस्ट २०२२ मध्ये दाखल झालेल्या एका गंभीर गुन्ह्यात मागील चार वर्षांपासून पोलिसांना गुंगारा देणारा फरार आरोपी सागर अनिल वनारसे (वय ३५, रा. निर्मलनगर) याला माळीवाडा बसस्थानक परिसरातून बेड्या ठोकण्यात आल्या आहेत. कोतवाली पोलीस ठाण्यात त्याच्यावर जाळपोळ व इतर गंभीर कलमांन्वये गुन्हा दाखल होता. पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे सपोनि विशाल चिटणीस आणि गुन्हे शोध पथकाने सापळा रचून त्याला जेरबंद केले.**

ताजनापूरच्या पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यातील गावांना

# पाणी देताना कोणावरही अन्याय होवू देणार नाही – ना. राधाकृष्ण विखे पाटील



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**शेवगाव–** शेवगावच्या हक्काचे पाणी कोणीही काढून घेणार नाही. ताजनापूरच्या पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यातील गावांना पाणी देताना कोणावरही अन्याय होवू न देता ताजपूरच्या तिसऱ्या टप्प्याची सुरूवात करण्याचा निर्णय जलसंपदा विभागाने घेतला असून, त्याच्या सर्व्हेक्षणासाठी एक कोटी रूपयांचा निधी मंजूर केला असल्याची माहीती न जलसंपदा तथा पालक मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

शेवगाव येथे मंत्री विखे पाटील यांच्या उपस्थितीत टंचाई आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.आ.मोनिका राजळे अतिरिक्त जिल्हाधिकारी शैलेंद्र हिंगे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी जलसंपदा विभागाचे मुख्य अभियंता अरूण नाईक अभियंता सुनंदा जगताप पल्लवी जगताप जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांच्यासह सर्व विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

मंत्री विखे पाटील यांनी तब्बल अडीच तास शेवगाव पाथर्डी तालुक्यातील शेतकरी नागरीक यांच्या तक्रारी जाणून घेत उपस्थित केलेल्या सर्व प्रश्नाबाबत त्यांनी विभागाच्या अधिकाऱ्यांकडून स्पष्टीकरण घेतले.प्राधान्याने पाणी व चारा यांचा प्रश्न गंभीर असून यावरच अधिक सूक्ष्मपणे आराखडा तयार करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी आणि जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकार्यांना दिल्या.टंचाईच्या परीस्थीतीत शेतकर्यांना पशुधनाचाच आधार मिळणार असून पशुधन वाचविण्यासाठी प्रयत्न करावे लागणार असल्याचे गांभिर्य अधिकार्यांनी घ्यावे आशा सूचना मंत्री विखे पाटील यांनी दिल्या.

ताजनापूरच्या संदर्भात बोलतांना मंत्री विखे पाटील म्हणाले की सर्व शेतकऱ्यांना पाणी मिळावे हीच आमची भूमिका आहे. शेवगावचे हक्काचे पाणी कोणी काढून घेतलेले नाही.ताजनापूरच्या टप्पा एक मधील राहीलेली आठ गावे,दुसर्या टप्प्यातील बावीस गावांना पाणी देण्यासाठी आवश्यक असलेल्या निधीस मंजूरी देण्यात आली असून,राहीलेल्या गावांसाठी तिसरा टप्पा करण्याचा निर्णय जलसंपदा विभागाने घेतला असून या गावांचे सर्व्हेक्षण करण्यासाठी एक कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येईल पुढच्या तीन महीन्यात हे सव्हेक्षण पूर्ण करण्याचे आदेश त्यांनी जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्याना दिले. दुष्काळाची धग मोठ्या प्रमाणात असल्याने दोन्ही तालुक्यात असलेल्या सर्व पाझर तलावतील आणि बंधार्यातील गाळ काढण्याची मोहीम तातडीने सुरू करावी.यासाठी मागेल त्याला काम देण्याची तयारी ठेवून लोकांना दिलासा देण्याची जबाबदारी प्रशासकीय अधिकार्यांनी घ्यावी.

उपलब्ध असलेले पाणी पाण्यासाठी राखून ठेवावे लागणार आहे.उरर्वित पाणी शेतीला देण्याचा विचार होईल परंतू पाईप फोडून पाणी उचलण्याचा प्रयत्न झाल्यास गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिलै असून,आतापर्तय ११४७ मोटारी जप्त करण्यात आल्याची माहीती मंत्री विखे पाटील यांनी दिली.

टंचाईच्या काळात सर्व अधिकाऱ्यांनी आपल्या कार्यक्षेत्रात अतिशय संवेदनशीलपणे काम करावे.कोणताहीहलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही. आ.मोनिका राजळे यांनी आपल्या भाषणात ताजनापूरच्या संदर्भात संभ्रम निर्माण करण्याचे काम झाले.त्यामुळे तिसरा टप्पा निर्माण करण्याचा जलसंपदा मंत्र्यांनी घेतेलेल्या निर्णयामुळे दोन वर्षात तिसरा टप्पा पूर्ण होईल आशी अपेक्षा व्यक्त केली.

# मान्सूनचा परतीचा प्रवास सुरू, राज्यावरील दुष्काळाचे संकट गडद

**मुंबई । वृत्तसंस्था** – मुंबईसह राज्यातील काही भागातून मोसमी वारे अर्थात मान्सूनने माघार घेण्यास सुरुवात केली आहे. मुंबई प्रादेशिक हवामान केंद्राने याबाबतची घोषणा केली आहे. दरम्यान, पुढील २ ते ३ दिवसांत संपूर्ण महाराष्ट्रातून मान्सून माघारी फिरण्यासाठी अनुकूल वातावरण निर्माण झाल्याची माहिती हवा मान विभागाने दिली आहे. त्यामुळे राज्यातील मान्सूनचा परतीचा प्रवास लवकरच पूर्ण होण्याची शक्यता आहे. मोसमी वारे हे राज्यामधल्या काही भागांमधून माघारी गेलेले आहेत. मुंबईसह राज्यामधल्या काही भागांमधून मोसमी वारे हे सध्या माघारी फिरत आहेत. पुढचे दोन–तीन दिवसात संपूर्ण राज्यामधून मान्सून माघारी फिरण्यासाठी अनुकूल असं वातावरण तयार होतं आहे. मुंबई प्रादेशिक हवामान केंद्राने या संदर्भातली माहिती दिली आहे. शेतकऱ्यांसाठी आणि सर्वसामान्यांसाठी देखील चिंता निर्माण करणारी ही बातमी आहे. भारतीय हवामान विभागाकडून मोठी घोषणा केली आहे. राज्यातल्या काही भागातून मोसमी वारे माघारी परतले ■ पान ४ वर

# ऑक्टोबर हीटचा तडाखा; अहिल्यानगरचा पारा ३५ अंशांवर

## पुढील दोन आठवडे उकाडा वाढण्याची शक्यता

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** मान्सूनचा पाऊस संपून परतीचा प्रवास सुरू होताच शहरात 'ऑक्टोबर हीट'चे तीव्र चटके जाणवू लागले आहेत. अहिल्यानगरचा पारा ३५ अंशांवर पोहोचला. अचानक वाढलेल्या तापमानामुळे दिवसभर उकाडा जाणवत असून, नागरिक हैराण झाले आहेत.

गेल्या वर्षी १ ऑक्टोबरला शहराचे कमाल तापमान २८ अंश, तर किमान तापमान २१ अंश होते. मे महिन्यात झालेला २२० मिलिमीटर अवकाळी पाऊस आणि जून ते सप्टेंबरदरम्यान कायम राहिलेला पाऊस यामुळे जमिनीतील ओलावा टिकून राहिला होता. त्यामुळे गेल्या वर्षी उष्णतेची तीव्रता तुलनेने कमी होती. यंदा मात्र जून ते सप्टेंबर या काळात बहुतांश दिवस कोरडे



गेल्याने परिस्थिती वेगळी आहे.

जिल्ह्यात अद्याप सुमारे ३० टक्के पावसाची तूट आहे. परतीच्या पावसाचे अवघे १४ दिवस शिल्लक असतानाही पावसाने पाठ फिरवल्याने यंदा ऑक्टोबर हीटची तीव्रता अधिक जाणवत आहे. ३ ऑक्टोबरपासून तापमानात आणखी एक ■ पान ४ वर

# खासदार नीलेश लंके यांची रेल्वे विषयक संसदीय स्थायी समितीवर नियुक्ती

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** खासदार नीलेश लंके यांची रेल्वे विषयक विभागाशी संबंधित संसदीय स्थायी समितीवर सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. भारत सरकारच्या राज्यसभा सचिवालयाने ३ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध केलेल्या संसदीय बुलेटिनमध्ये याबाबतची माहिती देण्यात आली आहे.



विभागाशी संबंधित संसदीय स्थायी समित्यांची २६ सप्टेंबर पासून पुनर्रचना करण्यात आली आहे. या पुनर्रचनेत रेल्वे विषयक समितीमध्ये लोकसभा सदस्य म्हणून खासदार लंके यांचा समावेश करण्यात आला आहे. समितीच्या अध्यक्षपदी सुधीर गुप्ता यांची नियुक्ती करण्यात आली असून, लोकसभा सदस्यांच्या यादीत खासदार नीलेश ज्ञानदेव लंके यांचे नाव क्रमांक १९ वर आहे.

रेल्वे विषयक संसदीय स्थायी समितीवर सदस्य म्हणून काम करण्याची संधी मिळाल्याने अहिल्यानगर लोकसभा मतदारसंघातील रेल्वेशी संबंधित प्रश्न संसदीय स्तरावर मांडण्यासाठी खासदार लंके यांना महत्त्वाचे व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. जिल्ह्यातील रेल्वे विकासाच्या प्रलंबित मागण्या, प्रवाशांच्या समस्या, नवीन रेल्वे सुविधा, स्थानकांचा विकास तसेच रेल्वे सेवांच्या विस्ताराशी संबंधित विषय या माध्यमातून पुढे नेता येणार आहेत.

अहिल्यानगरसह महाराष्ट्रातील रेल्वे विकासाशी संबंधित विविध प्रश्नांकडेही समितीच्या माध्यमातून लक्ष वेधता येणार आहे. प्रवाशांच्या सुविधा, प्रलंबित मागण्या आणि रेल्वे विकासाशी संबंधित विषयांचा पाठपुरावा करण्यासाठी या जबाबदारीचा उपयोग केला जाईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. खासदार लंके यांच्या या नियुक्तीमुळे अहिल्यानगर जिल्ह्यातील रेल्वे विकासाच्या प्रश्नांना संसदीय पातळीवर अधिक प्रभावीपणे मांडण्याची संधी उपलब्ध झाल्याने जिल्ह्यातून समाधान व्यक्त होत आहे.

छत्रपती शिवाजींच्या मावळ्यांप्रमाणे संघाच्या प्रचारकांनी जीवन समर्पित केल्यानेच देश सुरक्षित

# मठ-मंदिरं ही हिंदूंची स्फूर्तीकेंद्र – प. पू.स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** छत्रपती शिवाजी महाराजांच्या मावळ्यांप्रमाणे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या असंख्य प्रचारकांनी जीवन समर्पित केल्यानेच आपला देश सुरक्षित आहे. मठ-मंदिरं ही अखिल हिंदू धर्मीयांची स्फूर्तीकेंद्र आहेत, असे प्रतिपादन प.पू.स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज यांनी केले.

येथील श्रीरामकृष्ण सेवा ट्रस्टने नवीन टिळक रोडवरील नंदनवन लॉन्समध्ये आयोजित केलेल्या श्री छत्रपती शिवाजी महाराज चरित्र कथा सोहळ्याचे चतुर्थ पुष्प गुंफताना ते बोलत होते. ट्रस्टचे अध्यक्ष नंदलालजी मणियार, उपाध्यक्ष मोहनलाल मानधना, सचिव सुरेश चांडक, कोषाध्यक्ष मगनभाई पटेल तसेच सर्वश्री सुमित वर्मा, शरद झंवर, रामेश्वर बिहाणी, अशोक कानडे, पुरूषोत्तम पटेल, मिलिंद चवंडके, पुरूषोत्तम नावंदर, प्रमोद गांधी, यांच्यासह विविध भागांमधून आलेले शिवप्रेमी उपस्थित होते. नंदनवन उद्योग समूहाचे संजय जाधव हे स्वागताध्यक्ष नात्याने स्वागत करत होते.




श्री रामकृष्ण इंग्लिश मिडीयम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी म्हटलेला शिवरायांचा पाळणा स्फूर्तीदायी ठरला.

प.पू.स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज पुढे म्हणाले, शिवाजी महाराजांच्या पारिपत्यासाठी मिर्झाराजे जयसिंग यांनी नर्मदेच्या तीरावर एक कोटी चंडीयज्ञ आणि अकरा कोटी शिवलिंग पूजा केली. तहात ठरल्याप्रमाणे शिवाजी महाराज मिर्झाराजे जयसिंग यांच्याकडे आले असता त्यांनी मुलगा रामसिंग याच्यावर शिवरायांच्या संरक्षणाची आग्र्यामधील जबाबदारी सोपवली होती.

जीवाला जीव देणारे मावळे ही छत्रपती शिवाजी महाराजांची सर्वांत मोठी संपत्ती होती. देव, देश, धर्म आणि रयतेसाठी ■ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

### अहिल्यानगरमध्ये रविवारी 'इंडिया खेलो फुटबॉल'ची विशेष निवड चाचणी




अहिल्यानगर - फुटबॉल खेळाला प्रोत्साहन देत युवा खेळाडूंना राष्ट्रीय स्तरावर आपले कौशल्य सिद्ध करण्याची संधी मिळावी, यासाठी 'इंडिया खेलो फुटबॉल' अंतर्गत अहिल्यानगरमध्ये रविवार दि. ४ ऑक्टोबर रोजी विशेष निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले आहे. नमोह फुटबॉल क्लबच्या माध्यमातून ही निवड चाचणी घेण्यात येणार असून, १५ व १७ वर्षांखालील मुलांसह १७ वर्षांखालील मुलींना यात सहभागी होता येणार आहे.या निवड चाचणीतून गुणवत्तेच्या आधारे निवड झालेल्या खेळाडूंना पुढील टप्प्यातील 'इंडिया खेलो फुटबॉल' प्री-फायनल स्पर्धेत सहभागी होण्याची संधी मिळणार आहे. तसेच पुढे दिल्ली येथे होणाऱ्या राष्ट्रीय फायनल स्पर्धेत खेळण्याची संधीही निवड झालेल्या खेळाडूंना मिळणार असल्याची माहिती नमोह फुटबॉल क्लबच्या ओनर नमिता फिरोदिया यांनी दिली.अहिल्यानगरमध्ये फुटबॉलच्या प्रसारासाठी तसेच स्थानिक खेळाडूंना योग्य व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी नमोह फुटबॉल क्लब सातत्याने विविध उपक्रम राबवत आहे. क्लब हा 'इंडिया खेलो फुटबॉल' उपक्रमाचा विभागीय पार्टनर असून, या माध्यमातून नगरमधील युवा फुटबॉलपटूंना राज्य व राष्ट्रीय स्तरावर आपले कौशल्य दाखविण्याची संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जात आहे.भारतीय फुटबॉलचा दर्जा उंचावण्यासाठी देशभरातील २० हून अधिक शहरांमध्ये निवड चाचण्या घेण्यात येत आहेत. या उपक्रमामध्ये अहिल्यानगरचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे नगर व परिसरातील युवा फुटबॉल खेळाडूंसाठी ही निवड चाचणी महत्त्वाची संधी ठरणार आहे. अहिल्यानगरमध्ये होणाऱ्या निवड चाचणीत १७ वर्षांखालील मुले, १५ वर्षांखालील मुले तसेच १७ वर्षांखालील मुली सहभागी होऊ शकणार आहेत. सहभागी होणाऱ्या खेळाडूंना आपल्या खेळातील कौशल्य दाखविण्याची संधी मिळणार असून, निवड प्रक्रियेतून पुढील स्तरासाठी पात्र खेळाडूंची निवड केली जाणार आहे.ही निवड चाचणी रविवारी अशोक भाऊसाहेब फिरोदिया स्कूलच्या फुटबॉल मैदानावर सकाळी ८ वाजता आयोजित करण्यात आली आहे. अहिल्यानगर व परिसरातील इच्छुक युवा फुटबॉलपटूंनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन नमोह फुटबॉल क्लबच्या वतीने करण्यात आले आहे. निवड चाचणी व सहभागासंदर्भातील अधिक माहितीसाठी ८१४९१३०१२० या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### जलसंधारणातून गावविकासाचा 'हिवरेबाजार पॅटर्न' जाणून घेतला



अहिल्यानगर - एकेकाळी दुष्काळाच्या झळा सोसणाऱ्या हिवरेबाजारने जलसंधारण, काटेकोर नियोजन आणि ग्रामएकजुटीच्या बळावर आदर्श गाव म्हणून देशभरात ओळख निर्माण केली आहे. या गावाच्या सर्वांगीण विकास मॉडेलची पाहणी करण्यासाठी स्नेहबंध सोशल फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांनी आदर्शगाव हिवरेबाजारला भेट दिली. यावेळी त्यांनी पद्मश्री पोपटराव पवार यांची भेट घेऊन त्यांना पुस्तक भेट दिले.या भेटीदरम्यान पवार यांनी हिवरेबाजारच्या विकासाची वाटचाल आणि विविध उपक्रमांची सविस्तर माहिती दिली. जलसंधारणासोबतच पाण्याचे ऑडिट, उपलब्ध पाण्याचे नियोजन आणि दुष्काळी परिस्थितीत पाण्याची बचत करून भूजलपातळी वाढविण्यासाठी केलेल्या उपाययोजनांवर त्यांनी विशेष मार्गदर्शन केले. बांधबांधणी, दारूबंदी, नशाबंदी आणि सामूहिक वृक्षारोपण यांसारख्या उपक्रमांमुळे गावाच्या विकासाला गती मिळाल्याचे त्यांनी सांगितले. पाण्याचे महत्त्व ओळखून त्याचे योग्य नियोजन केले, तर दुष्काळी परिस्थितीतही गावाचा शाश्वत विकास साधता येतो, हे हिवरेबाजारने दाखवून दिले आहे. गावाच्या विकासाचे हे मॉडेल अभ्यासण्यासाठी देशभरातून अनेकजण येथे येत असल्याचेही यावेळी सांगण्यात आले. हिवरेबाजार हे जलसंधारण, शिस्तबद्ध नियोजन आणि ग्रामएकजुटीच्या बळावर उभे राहिलेले आदर्श मॉडेल आहे. येथील अनुभव इतर गावांसाठी प्रेरणादायी ठरेल,'' असे डॉ. उद्धव शिंदे यांनी सांगितले. यावेळी राम आकसाळ व सतीश गाडेकर उपस्थित होते.

## सकारात्मक बातम्यांना महत्व दिले पाहिजे : ना. बागडे

### कुवळेकर यांना श्री नागनाथ फटाले पत्रकारिता जीवन साधना गौरव पुरस्कार प्रदान । मानकन्हैय्या ट्रस्टचा उपक्रम




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पत्रकारांनी समाजाचे प्रश्न निश्चितपणे मांडलेच पाहिजे, नकारात्मक बातम्यांना न्यूज व्हॅल्यु असते, परंतू सकारात्मक बातम्या वाचल्या जात नाही, ही वस्तूस्थिती आहे. त्यामुळे नैतिकता निघून जात आहे. सकारात्मक बातम्यांना महत्व दिले पाहिजे. म्हणूनच तर पत्रकरांनी समाजाचे प्रश्न मयदित मांडले पाहिजे, अशी अपेक्षा राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनी व्यक्त केले.

छ. संभाजीनगर येथील आयएमए सभागृहात डॉ. कांकरिया यांच्या मानकन्हैय्या ट्रस्टतर्फे आयोजित सोहळ्यात ज्येष्ठ पत्रकार विजय कुवळेकर यांना 'श्री नागनाथ फटाले पत्रकारिता जीवन साधना गौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आला. राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते हा सन्मान सोहळा पार पडला. या प्रसंगी व्यासपीठावर महापौर समीर राजुरकर, ज्येष्ठ पत्रकार नागनाथ फटाले, सिंधू फटाले, संजीवनी कुवळेकर, डॉ. सुधा कांकरिया आणि डॉ. प्रकाश कांकरिया आदी मान्यवर उपस्थित होते. त्यावेळी ना. बागडे बोलत होते.

ना. बागडे यांनी नागनाथ फटाले यांनी केलेल्या उत्तम व उत्कृष्ट पत्रकारितेचे तोंडभरून कौतुक केले. ते म्हणाले की, फटाले यांनी त्या काळात लोकोपयोगीच पत्रकारिता केली. त्यांनी सेवेत अट नाही, अन् निष्ठेला फट नाही याच विचाराने कामकाज केले. ते आयुष्यभर पत्रकारितेशी एकनिष्ठ राहिले, त्यांची पत्रकारिता आजच्या काळासाठी निश्चितपणे प्रेरणादायी आहे, असे ना. बागडे यांनी नमूद केले. काही वर्षांपूर्वी डॉ. सुधा कांकरिया यांच्या विनंतीला मान देऊन मरणोत्तर नेत्रदानाचा फॉर्मही भरल्याचे त्यांनी आवर्जुन सांगितले. सदर समारंभात डॉ. सुधा कांकरिया संपादित 'आधारस्तंभ' या समरणिकेचे प्रकाशनही झाले.

पुरस्कारार्थी श्री. कुवळेकर मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, पत्रकारितेचे सर्वात मोठे भांडवल हे विश्वासार्हता आहे. सध्याच्या काळात पत्रकारितेसमोर विश्वासार्हता टिकवून ठेवणे हे सर्वात मोठे आव्हान बनले आहे, पत्रकारिता हा समाजाशी नाते जोडणारा व्यवसाय असून, ज्या दिवशी पत्रकारितेत केवळ पैशालाच महत्त्व दिले जाईल, त्या दिवशी विश्वासार्हतेचा प्रश्न निर्माण होईल, असा इशाराही त्यांनी दिला. कोणत्याही संपादकाच्या यशामागे त्याच्या सहकार्यांचे मोलाचे योगदान असते, असे सांगत त्यांनी

## आनंद तीर्थ समवशरण येथे जिनेश्वरी अधिवेशन उत्साहात

## तीर्थंकरांच्या शक्तीतून जिनेश्वरी विश्वेश्वरी बनेल : पूज्य प्रविणऋषीजी महाराज

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**अहिल्यानगर–** राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी म.सा. यांच्या पावन भूमीत आनंद तीर्थ समवशरण येथे सुरू असलेल्या समर्पण चातुर्मासात शुक्रवारी भव्य जिनेश्वरी अनुष्ठान पार पडले. हजारो महिलांनी यात सहभाग घेतला. नगरसह महाराष्ट्र तसेच देशाच्या विविध भागातून आलेल्या भाविकांनी यात सहभाग घेतला. अहिल्यानगरकी गलियो में कमाल हो गया, सबको गुरू आनंद का दिदार हो गया, या गीताने परिसर दुमदुमला.

आनंद तीर्थ समवशरण येथे महाराष्ट्र प्रवर्तक पूज्य कुंदनऋषीजी म.सा., उपाध्याय प्रवर पूज्य प्रविण ऋषीजी म.सा., पूज्य तिर्थेशऋषीजी म.सा., पूज्य आलोकऋषीजी म.सा., महासतीजी पूज्य सत्यप्रभाजी म.सा., पूज्य अमितज्योतीजी म.सा. आदी साधू साध्वीजींच्या सान्निध्यालत झालेल्या जिनेश्वरी अधिवेशनास अयोध्येतील राम मंदिर ट्रस्टचे महा सचिव पूज्य गोविंददेवगिरीजी महाराज यांच्यासह समर्पण चातुर्मास समितीचे अध्यक्ष अशोक (बाबूशेठ) बोरा, महामंत्री आदेश चंगेडिया, कार्याध्यक्ष राजेश भंडारी, कोषाध्यक्ष विलास कटारिया, उपाध्यक्ष अनिल पोखरणा, राजकुमार बोरा, विजय गुगळे, सुरेश कांकरिया, सचिन देसरडा, मनसुख गुंदेचा, सहसचिव अभय गांधी, अभिजीत गांधी, कमिटी उपस्थित होते. कमिटीच्या वतीने गोविंददेवगिरीजी महाराज यांचा सन्मान करण्यात आला.

पूज्य प्रविण ऋषीजीमहाराज म्हणाले, जिज्ञासेतूनच नवीन ज्ञान प्राप्त होते. जंबूस्वामींनी सुधर्मा स्वामींना जिज्ञासेतून तीर्थंकर महावीर यांच्या विषयी माहिती विचारली आणि त्यानंतर सुधर्मा स्वामींनी त्यांच्या अनुभूतीतील भगवान महावीर यांचे सुंदर वर्णन केले. आज तीर्थंकरांची शक्ती येथे जिनेश्वरी अधिवेशनात दिसून येत आहे. तीर्थंकरांच्या शक्तीतून जिनेश्वरी विश्वेश्वरी बनेल. महासागरातून आपण पाणी घेऊ शकत नाही तर त्यात सागराचा दोष नाही. आपल्याला आपली झोळी मजबूत करायची यासाठी हे अनुष्ठान आहे. आग्रह सोडला तरच अनुग्रह होईल. आयुष्यात फक्त परमात्म्याचे गुणगान केले पाहिजे. आपल्याकडे तीर्थंकरांची अद्भुत वाणी आहे. ऊर्जा आहे. फक्त त्यांचेच गुणगान व्हावे. जगाला जिनेश्वरीचे भक्त बनवायचे आहे.

पूज्य गोविंददेवगिरीजी महाराज म्हणाले की, आज याठिकाणी मला गुरू देवांचे मंगल आशिर्वचन प्राप्त झाले आहे. आचार्यश्रींचे अपार प्रेम मला प्राप्त झालेले आहे. ते आमच्या बेलापूर येथील घरी गोचरीसाठी यायचे, एवढे मोठे पुण्य आम्हाला लाभले. इथे जिनेश्वरी अनुष्ठान करणाऱ्या मातांना मी वंदन करतो. यातून पुढच्या पिढीला योग्य संस्कार मिळणार आहेत. समर्पण चातुर्मासाचे मुख्य लाभार्थी मुंबईचे प्रसिद्ध उद्योगपती आणि अहिल्यानगरचे सुपुत्र तथा तिरूपती बालाजी देवस्थानचे विश्वस्त सौरभ हेमराजजी बोरा, सौ. राखी सौरभ बोरा, प्रमिलाताई हेमराजजी बोरा, पराग बोरा व बोरा परिवार आहे. अशोक बाबूशेठ बोरा म्हणाले, गुरूदेवांच्या पावन भूमीत जिनेश्वरी ग्रुपचे अतिशय भव्य दिव्य अधिवेशन झाले आहे. आज इथले दृष्य पाहून केशरचा वर्षाव झाल्याची अनुभूती आली. पूज्य कुंदनऋषीजी म.सा., पूज्य प्रविण ऋषीजी म.सा. यांच्या आशीर्वादाने हे शक्य झाले असून समर्पण चातुर्मास ऐतिहासिक ठरत आहे. आज पूज्य गोविंददेवगिरीजी महाराज यांनी कार्यक्रमाला उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली आहे.

## लायन्स क्लबच्या सेवाभावी उपक्रमांनी गांधी जयंती साजरी



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीचे औचित्य साधून लायन्स क्लब ऑफ अहमदनगरच्या वतीने विविध सेवाभावी उपक्रमांचे आयोजन करून सेवा सप्ताहास उत्साहात प्रारंभ करण्यात आला. वाडियापार्क क्रीडा संकुल येथील महात्मा गांधी यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून सेवा सप्ताहाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी माळीवाडा येथील महात्मा फुले छात्रालयातील विद्यार्थ्यांसाठी फॅनची भेट देण्यात आली. तसेच विद्यार्थ्यांसाठी सकाळी चहा व नाश्त्याचीही व्यवस्था करण्यात आली.

लायन्स क्लबच्या माध्यमातून समाजातील गरजू व वंचित घटकांना मदतीचा हात देत विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. त्याच सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून गांधी जयंतीनिमित्त सेवा सप्ताहाची सुरुवात करण्यात आली. विद्यार्थ्यांना आवश्यक असलेल्या सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने महात्मा फुले छात्रालयास सुमित लोढा यांच्या वतीने फॅन देण्यात आला. यावेळी लायन्स क्लबचे अध्यक्ष हरजितसिंह वधवा, सचिव हरिष हरवाणी, खजिनदार विजय कुलकर्णी, प्रकल्प प्रमुख किरण भंडारी, धनंजय भंडारे, सुमित लोढा, सुनील छाजेड, प्रशांत मुनोत, डॉ. सिमरन वधवा, पूर्णाक्षी शाह, सुरेश खामकर, तसेच महात्मा फुले वसतिगृहाचे गणेश कोरडे यांच्यासह लायन्स क्लबचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अध्यक्ष हरजितसिंह वधवा यांनी सांगितले की, लायन्स इंटरनॅशनलच्या प्रणालीप्रमाणे २ ते ८ ऑक्टोबरदरम्यान जगभरात सेवा सप्ताह साजरा केला जात आहे. या सप्ताहाच्या माध्यमातून समाजातील गरजू, वंचित आणि दुर्बल घटकांपर्यंत मदत पोहोचविण्यासाठी विविध सामाजिक उपक्रम राबविले जात आहेत. गांधीजींनी समाजसेवा, स्वच्छता आणि सर्वसमावेशकतेचा दिलेला संदेश लक्षात घेऊन सेवाभावी उपक्रमांना चालना देण्याचा लायन्स क्लबचा प्रयत्न आहे.

## लोकशाही मजबूत ठेवण्यासाठी जनतेने सजग राहणे गरजेचे : दीप चव्हाण

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या विचारांनी देशाच्या लोकशाही मूल्यांना आणि राष्ट्रनिर्मितीच्या कार्याला दिशा दिली. आजच्या काळात लोकशाही व्यवस्था अधिक मजबूत ठेवण्यासाठी नागरिकांनी सजग राहून आपल्या मतदानाच्या अधिकाराचे महत्त्व समजून घेणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन शहर जिल्हाध्यक्ष दीप चव्हाण यांनी केले.

महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त आणि माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रमात अहिल्यानगर काँग्रेस शहर जिल्हाध्यक्ष दीप चव्हाण यांनी मार्गदर्शन केले. यावेळी गांधी व शास्त्री यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



या कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसच्या वतीने २ ते ८ ऑक्टोबरदरम्यान देशभर 'लोकशाही वाचवा सप्ताह' आणि 'मत वाचवा - देश वाचवा' अभियान राबविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या अभियानांतर्गत जिल्हास्तरावर इंडिया आघाडीतील सहकारी पक्षांसोबत संयुक्त बैठक, त्यानंतर जिल्हास्तरीय मोर्चाचे आयोजन तसेच मोठ्या संख्येने नागरिकांचा सहभाग सुनिश्चित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

प्राध्यापक डॉक्टर बापू चंदनशिवे व प्राध्यापक डॉक्टर बाळासाहेब पवार यांची यावेळी भाषणे झाली. भारताच्या स्वातंत्र्यांनी लढ्यात महात्मा गांधी यांनी दिलेले योगदान खूप महत्त्वाचे आहे. त्यांनी भारतवासीयांना नाही तर संपूर्ण जगाला मानवता एकता, अहिंसा, सत्याग्रह याद्वारे जो विचार दिला तो चिरकाल टिकणारा शाश्वत विचार आहे असे ते म्हणाले. निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीविषयी उपस्थित करण्यात आलेल्या मुद्द्यांच्या पार्श्वभूमीवर हे आंदोलन पुढे नेण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे पीडीएफमधील पत्रकात नमूद आहे. जिल्हास्तरीय मोर्चाची सुरुवात महात्मा गांधी किंवा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून करून तो जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत नेण्याचे तसेच तेथे भारतीय संविधानातील कलम ३२६ चे सार्वजनिक वाचन करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

## 'श्री गणेशा आरोग्याचा अभियान २०२६' मधून आरोग्यसेवेचा जागर



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** डॉ. विखे पाटील मेमोरियल हॉस्पिटल आणि डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कॉलेज ऑफ नर्सिंग, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच समुदाय आरोग्य परिचर्या विभागाच्या वतीने महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या निर्देशानुसार 'श्री गणेशा आरोग्याचा अभियान २०२६' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या अभियानांतर्गत साईनाथ उद्योग इंडस्ट्रीज, अहिल्यानगर येथे कामगारांची आरोग्य तपासणी करण्यात आली. यावेळी कामगारांना आरोग्यविषयक मार्गदर्शन व आरोग्य शिक्षण देण्यात आले. तसेच श्रमिकनगर येथील मल्लेशम येमुल आरोग्य केंद्रात आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले.

अभियानाच्या माध्यमातून आरोग्य तपासणीसोबतच नागरिकांमध्ये आरोग्यविषयक जनजागृती करण्यात आली. योग्य व संतुलित आहार, नियमित व्यायाम, आरोग्यदायी जीवनशैली, आजारांपासून बचावासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि आरोग्यविषयक समस्या जाणवल्यास वेळेवर वैद्यकीय सल्ला घेण्याबाबत नागरिकांना मार्गदर्शन करण्यात आले. शिबिरात सहभागी नागरिकांच्या आरोग्यस्थितीनुसार आवश्यक वैद्यकीय मार्गदर्शन करण्यात आले. 'निरोगी समाज, सुदृढ कुटुंब' ही संकल्पना केंद्रस्थानी ठेवून समाजातील विविध घटकांमध्ये आरोग्यविषयक जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न या अभियानातून करण्यात आला. या उपक्रमाला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुजय राधाकृष्ण विखे पाटील यांनी अभियानात सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. अभियानाच्या यशस्वी आयोजनासाठी वैद्यकीय संचालक प्रा. डॉ. अभिजित दिवटे यांचे मार्गदर्शन लाभले. वैद्यकीय सेवा संचालक ब्रिगेडियर डॉ. अरुण त्यागी (सेवानिवृत्त), प्रशासकीय अधिकारी डॉ. प्रसाद काजळे आणि वैद्यकीय अधीक्षक डॉ. सतीश मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली वैद्यकीय व सामाजिक सेवा पथकाने उपक्रमात सक्रिय सहभाग घेतला.

रुग्णालयाच्या वतीने वैद्यकीय समाजकार्यकर्ता संतोष साळवे, निलेश बनसोडे आणि करण ढोकणे यांनी शिबिराच्या नियोजन, समन्वय व आयोजनात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. कॉलेज ऑफ नर्सिंगच्या प्राचार्या डॉ. प्रतिभा चांदेकर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच उपप्राचार्या व विभागप्रमुख डॉ. योगिता औताडे यांच्या समन्वयातून अमोल अनाप, राहुल कडू, विशाल पुलाटे, दिनेश मगर, प्रिती कडू यांच्यासह विद्यार्थ्यांनी अभियानाच्या नियोजन व आयोजनात सक्रिय सहभाग घेतला.

## पद्मशाली सोशल फाउंडेशनच्या निबंध स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ उत्साहात

### श्रेयस वाघ, रितविका गोंडगिरे, प्रियांका सिनारे प्रथम । 'रील पाहण्यापेक्षा पुस्तक वाचा'; आयुक्त यशवंत डांगे यांचे विद्यार्थ्यांना आवाहन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पद्मशाली सोशल फाउंडेशन ट्रस्टच्या वतीने गणेशोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या निबंध स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ श्री मार्कंडेय शैक्षणिक संकुल, नेप्ती नाका, अहिल्यानगर येथे उत्साहात पार पडला. या स्पर्धेला तब्बल ४५० स्पर्धकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. इयत्ता ५वी ते ७वी, इयत्ता ८वी ते १०वी आणि खुला गट अशा तीन गटांमध्ये घेण्यात आलेल्या स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके, सन्मानचिन्हे व प्रमाणपत्र देऊन व फेटा बांधून गौरविण्यात आले. तसेच स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी निवृत्त शिक्षिका सुरेखा आडम होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून अहिल्यानगर महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे, श्री मार्कंडेय मंदिर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर मंगलारप, अहिल्यानगर महानगरपालिकेचे विषयतज्ज्ञ अरुण पालवे, शिक्षण विस्तार अधिकारी शेख राज मोहम्मद, सामाजिक कार्यकर्ते रवी दंडी, इंजि. प्रशांत कोक्कुल, पद्मशाली सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष गणेश लकशेट्टी आदी उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना आयुक्त यशवंत डांगे म्हणाले की, आजच्या काळात विद्यार्थ्यांचा मोठा वेळ मोबाईल आणि रील पाहण्यात जात आहे. विद्यार्थ्यांनी रील पाहण्यापेक्षा पुस्तकांकडे पाहावे, पुस्तक वाचावे आणि वाचनातून ज्ञान मिळवावे. वाचनामुळे विचारांची व्याप्ती वाढते, लेखनकौशल्य विकसित होते आणि व्यक्तिमत्त्व घडण्यास मदत होते. विद्यार्थ्यांनी विविध विषयांवरील पुस्तके वाचावीत, आपल्या मनातील विचार मांडावेत आणि अशा स्पर्धांमध्ये सातत्याने सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.




पद्मशाली सोशल फाउंडेशनने गणेशोत्सवाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या लेखनकौशल्याला वाव मिळावा तसेच नागरिकांच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि पर्यावरणीय पैलूंवर विचारमंथन व्हावे, या उद्देशाने निबंध स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेला ४५० स्पर्धकांनी सहभाग नोंदवून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. विद्यार्थ्यांना आपल्या विचारांना व्यासपीठ मिळावे आणि ते व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचे काम पद्मशाली सोशल फाउंडेशनने केले आहे, असे त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय भाषणात निवृत्त शिक्षिका सुरेखा आडम म्हणाल्या की, विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी वाचन आणि लेखन या दोन्ही गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. विद्यार्थ्यांनी केवळ पाठांतरावर अवलंबून न राहता विविध विषयांचे वाचन करून त्यावर स्वतःचा विचार करण्याची सवय लावून घ्यावी. निबंध स्पर्धेसारख्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना आपल्या भावना, विचार आणि कल्पना शब्दबद्ध करण्याची संधी मिळते. पद्मशाली सोशल फाउंडेशनने गणेशोत्सवाच्या निमित्ताने आयोजित केलेल्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या लेखनकौशल्याला चांगले व्यासपीठ मिळाले आहे. तब्बल ४५० स्पर्धकांनी सहभाग घेतल्याने विद्यार्थ्यांमध्ये लेखन आणि विचार करण्याची आवड निर्माण होत असल्याचे दिसून येते. अशा उपक्रमांना पालक, शिक्षक आणि समाजाने प्रोत्साहन दिल्यास विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यास निश्चितच मदत होईल, असे त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय प्रास्ताविक

प्रास्ताविकात पद्मशाली सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष गणेश लकशेट्टी म्हणाले की, गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव न राहता सामाजिक आणि सांस्कृतिक जाणीवा जागृत करणारा उत्सव व्हावा, या उद्देशाने निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी गणेशोत्सवातील सामाजिक, सांस्कृतिक, पर्यावरणीय आणि आर्थिक पैलू समजून घ्यावेत, आपल्या विचारांना लेखणीच्या माध्यमातून व्यक्त करावे, यासाठी ही स्पर्धा घेण्यात आली. तीनही गटांमध्ये मिळून ४५० स्पर्धकांनी सहभाग घेतल्याने फाउंडेशनच्या या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ देण्यासाठी फाउंडेशनच्या माध्यमातून भविष्यातही विविध उपक्रम राबविण्यात येतील, असे त्यांनी सांगितले.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### मनाच्या श्लोकांवर आधारित मनोबोध ॲपचे थाटात लोकार्पण



अहिल्यानगर - मनोबोध या रामदास स्वामींच्या मनाच्या श्लोकांवरील ग्रंथाचा आधुनिक आविष्कार अर्थात कृत्रिम बुद्धिमत्ता ( आर्टीफीशल इंटेलिजन्स )ए आय ची मदत घेऊन केलेल्या ॲपचे ज्येष्ठ समर्थ भक्त आणि श्री सुंदरमठ सेवा समितीचे विश्वस्त डॉ. विजय लाड यांचे हस्ते नुकतेच लोकार्पण करण्यात आले. ऑनलाईन झालेल्या या सोहळ्यात समर्थ रामदास स्वामींच्या अनेक मठांचे मठपती तसेच समर्थ वाङ्मयाचे अभ्यासक, चिंतक आणि संशोधक उपस्थित होते. दासबोध सखोल अभ्यास फाउंडेशनच्या तंत्रज्ञान शाखेतील चमूने व पुण्यातील आनंद जोगळेकर व त्यांचे कुटुंब आणि सहकारी मिळून मनाच्या श्लोकातील रहस्य सहजपणे उलगडण्यासाठी मनोबोध ए आय हे ॲप तयार केले आहे. अध्यात्मिक क्षेत्रातली मनोबोध हे एक क्रांतिकारी पाऊल आहे असे डॉ. विजय लाड यावेळी म्हणाले. बलोपासने बरोबरच किंबहुना किंचित जास्तच ‘ मनो पासना आवश्यक होत आहे. मनोबोध हे ॲप त्यासाठी अतिशय उपयुक्त ठरेल. तरुण पिढी बरोबरच सर्व वयोगटातील विशेषतः शालेय वयोगटातील मुलांची उत्सुकता क्षमवण्यासाठी हे ॲप मार्गदर्शक ठरेल. मनाच्या श्लोकातून मानवी जीवनातील ताण-तणाव, कौटुंबिक, आर्थिक , वैचारिक प्रश्नांवर हे ॲप संदर्भांकित ओव्या आणि त्याचा अर्थ देऊन उत्तर देण्याचा प्रयत्न करते. महत्त्वाचे म्हणजे इंग्रजी आणि मराठी या दोन्ही भाषांतून विचारलेल्या प्रश्नांना संबंधित असलेल्या ओव्या आणि त्यांचा सार भावार्थ रूपाने हे ॲप काही क्षणातच समोर ठेवते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी करण्यासाठी वृंदा जोगळेकर, अमेय महाबळेश्वरकर , सौ मुग्धा महाबळेश्वरकर, अपर्णा वांगीकर यांनी परिश्रम घेतले.

### ग्रामसेवकाविरोधात कारवाईच्या मागणीसाठी जिल्हा परिषदेत आमरण उपोषण



अहिल्यानगर- श्रीगोंदा तालुक्यातील मौजे चिखली-कोरेगाव येथील ग्रामसेवक तानाजी सोनबा पानसरे यांच्यावर मुख्यालयी वास्तव्यास न राहता खोटे भाडेकरारनामे व बोगस पावत्या सादर करून शासकीय घरभाडे भत्ता घेतल्याचा तसेच ग्रामपंचायतीच्या प्रशासकीय कामकाजात माजी सरपंचांची अनधिकृत स्वाक्षरी व शिक्का वापरल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी चौकशीचे आदेश होऊनही ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप करत सामाजिक कार्यकर्ते महेश भिवसेन झेंडे यांनी जिल्हा परिषद कार्यालयाच्या आवारात आमरण उपोषण सुरू केले आहे. महेश झेंडे यांनी दिलेल्या निवेदनानुसार, ग्रामसेवक तानाजी पानसरे हे सन २०२२ ते २०२६ या कालावधीत चिखली-कोरेगाव येथे मुख्यालयी न राहता पेडगाव येथे वास्तव्यास होते. मात्र, शासनाची दिशाभूल करण्याच्या उद्देशाने दरवर्षी खोटे भाडेकरारनामे व बोगस पावत्या सादर करून शासकीय तिजोरीतून घरभाडे भत्ता घेतल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. तसेच ग्रामपंचायतीचा प्रशासकीय ताबा असताना माजी सरपंच कुलदीपसिंह कदम यांची कथितपणे अनधिकृत स्वाक्षरी व शिक्का वापरून विषयपत्रिकेवरील अजेंडा तयार करण्यात आल्याचा गंभीर आरोपही करण्यात आला आहे. या प्रकरणाची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी यापूर्वी करण्यात आली होती.दरम्यान, या तक्रारीची दखल घेत उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी गटविकास अधिकारी, पंचायत समिती श्रीगोंदा यांना आठ दिवसांच्या आत चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिल्याचे झेंडे यांनी सांगितले.

# अहिल्यानगरच्या भाई सथ्था नाईट हायस्कूलची राष्ट्रीय पातळीवर दखल

## ‘शिक्षण अनुभूती’ फ्लिप बुकमध्ये भाई सथ्था नाईट हायस्कूलचा समावेश– डॉ. पारस कोठारी

### ‘मिपा’च्या राज्यातील १०० निवडक शाळांच्या यादीत स्थान

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** शहरातील हिंद सेवा मंडळ संचलित भाई सथ्था नाईट हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज या रात्रशाळेच्या शैक्षणिक वाटचालीची आणि विद्यार्थीकेंद्रित नाविन्यपूर्ण उपक्रमांची राष्ट्रीय पातळीवर दखल घेण्यात आली आहे. महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा), छत्रपती संभाजीनगर यांच्या माध्यमातून राज्यातील विद्यार्थीहिताच्या दृष्टीने उल्लेखनीय शैक्षणिक उपक्रम राबविणाऱ्या शाळांची माहिती संकलित करण्यात आली. त्यामध्ये अहिल्यानगर जिल्ह्यातून भाई सथ्था नाईट हायस्कूलचा समावेश करण्यात आला आहे.

या यशोगाथेचा समावेश राष्ट्रीय शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (निपा), नवी दिल्ली यांच्या माध्यमातून तयार करण्यात आलेल्या ‘शिक्षण अनुभूती’ या फ्लिप बुकमध्ये करण्यात आला आहे. महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविणाऱ्या निवडक १०० शाळांच्या यशोगाथांचा या उपक्रमात समावेश करण्यात आला असून, त्यामध्ये अहिल्यानगर जिल्ह्यातील भाई सथ्था नाईट हायस्कूलला स्थान मिळाले आहे.

राज्यातील विविध शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीबरोबरच त्यांचा सर्वांगीण विकास, कौशल्यविकास आणि भविष्यातील रोजगाराच्या संधी लक्षात घेऊन राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती संकलित करण्यात आली होती. या प्रक्रियेत निवडक शाळांच्या प्रभावी उपक्रमांची आणि त्यांच्या यशस्वी वाटचालीची माहिती ‘शिक्षण अनुभूती’ या फ्लिप बुकच्या माध्यमातून मांडण्यात आली आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातून या निवडक यशोगाथांमध्ये भाई सथ्था नाईट हायस्कूलचा समावेश करण्यात आला असून, जिल्ह्यातून समाविष्ट झालेली राज्यातील ही एकमेव रात्रशाळा असल्याचे सांगण्यात आले आहे. जिल्ह्यातील इतर दोन जिल्हा परिषद शाळांचाही या उपक्रमात समावेश आहे. रात्रशाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या विविध अडचणी लक्षात घेऊन केवळ अभ्यासक्रम पूर्ण करण्यावर भर न देता त्यांना रोजगारक्षम बनविणे, विविध कौशल्ये आत्मसात करण्याची संधी उपलब्ध करून देणे आणि त्यांच्या आर्थिक व



सामाजिक प्रगतीला चालना देणे, या दृष्टिकोनातून विविध उपक्रम राबविण्यात आले.

रात्रशाळेचे चेअरमन डॉ. पारस कोठारी म्हणाले की, भाई सथ्था नाईट हायस्कूलची यशोगाथा राष्ट्रीय शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (निपा), नवी दिल्ली यांच्या ‘शिक्षण अनुभूती’ या फ्लिप बुकमध्ये समाविष्ट होणे ही संपूर्ण अहिल्यानगरसाठी अभिमानाची बाब आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच त्यांना रोजगाराभिमुख कौशल्ये आणि विविध व्यावसायिक संधी उपलब्ध करून देण्याचा आमचा सातत्याने प्रयत्न आहे. महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीचे द्विशताब्दी वर्ष साजरे होत असताना रात्रशाळेच्या कार्याची राष्ट्रीय पातळीवर दखल घेतली जाणे हे महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक कार्याला खऱ्या अर्थाने अभिवादन आहे. प्राचार्य, शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या सामूहिक प्रयत्नांमुळे हे यश मिळाले असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

भाई सथ्था नाईट हायस्कूलचे प्राचार्य सुनील सुसरे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सर्व शिक्षक– शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये रोजगार मेळावे, विविध कौशल्य प्रशिक्षण उपक्रम, व्यावसायिक अभ्यासक्रम तसेच विद्यार्थ्यांच्या आर्थिक स्तरात सुधारणा घडवून आणण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन यांचा समावेश आहे.

रात्रशाळेत शिक्षण घेणारे अनेक विद्यार्थी दिवसभर रोजगार, व्यवसाय किंवा अन्य कामांमध्ये व्यस्त असतात. अशा विद्यार्थ्यांना त्यांच्या शिक्षणाबरोबरच व्यावसायिक व कौशल्याधारित संधी उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने शाळेच्या माध्यमातून विविध उपक्रमांना चालना देण्यात आली. त्यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच रोजगाराच्या संधी, कौशल्यविकास आणि स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी आवश्यक दिशा मिळण्यास मदत झाली. या विद्यार्थीकेंद्रित आणि नाविन्यपूर्ण उपक्रमांची दखल घेत भाई सथ्था नाईट हायस्कूलची यशोगाथा ‘शिक्षण अनुभूती’ या राष्ट्रीय स्तरावरील फ्लिप बुकमध्ये समाविष्ट करण्यात आली आहे.

महाराष्ट्रात महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीचे द्विशताब्दी वर्ष साजरे होत असताना भाई सथ्था नाईट हायस्कूलची यशोगाथा राष्ट्रीय पातळीवरील शैक्षणिक उपक्रमात समाविष्ट होणे ही विशेष अभिमानाची बाब आहे. महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी सर्वसामान्य, वंचित आणि शिक्षणापासून दूर असलेल्या घटकांसाठी शिक्षणाची दारे खुली करण्याचे कार्य केले. त्याच विचारांना पुढे नेत रात्रशाळा कामगार, कर्मचारी आणि विविध कारणांमुळे दिवसा नियमित शिक्षण घेऊ न शकणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली जात असल्याचे प्राचार्य सुनिल सुसरे यांनी सांगितले. रात्रशाळेत विविध उपक्रम राबविण्यासाठी माध्यमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी श्रीमती संध्या गायकवाड, योजना विभागाचे शिक्षणाधिकारी श्री बाळासाहेब बुगे, मनपा शिक्षण मंडळाचे प्रशासनाधिकारी जुबेर पठाण यांचे मार्गदर्शन लाभले तसेच उपक्रमांसाठी सहकार्य करणाऱ्या मासूम संस्थेच्या संचालिका श्रीमती निकिता केतकर तसेच जन शिक्षण संस्था, मिटकॉन या संस्थांचे विशेष आभार मानण्यात आले शिक्षण अनुभूती या मध्ये रात्र शाळेची यशोगाथा प्रसिद्ध झाल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष ॲड. अनंत फडणीस, कार्याध्यक्ष अनंत देसाई, मानद सचिव सुमतीलाल कोठारी, संजय जोशी डॉ.रमेश झरकर, ज्येष्ठ मार्गदर्शक ब्रिजलालजी सारडा, अजितशेठ बोरा व सर्व सन्माननीय पदाधिकारी यांनी शालेय समितीचे चेअरमन, शालेय समिती सदस्य व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

ज्येष्ठ नागरिकांच्या सेवेसाठी आधार आपुलकी फाउंडेशनचा पुढाकार

## तीन चाकी सायकल भेट देत सामाजिक बांधिलकी जपली



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** आनंद योग सेंटरच्या पुढाकाराने आधार आपुलकी फाउंडेशन, अहिल्यानगर यांच्या वतीने ज्येष्ठ नागरिकांच्या सेवेसाठी राबविण्यात आलेल्या उपक्रमांतर्गत श्री. गोविंद रामभाऊ खापरे यांना तीन चाकी सायकल भेट देण्यात आली. अहिल्यानगरमधील प्रसिद्ध डॉक्टर श्री. सुचित तांबोळी आणि सौ . नेहा तांबोळी यांच्या विशेष सहकार्याने हा उपक्रम पार पडला.

डॉ. सुचित तांबोळी यांचे वडील स्व. सुरेश गंगाधर तांबोळी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ त्यांच्या पत्नी श्रीमती सविता सुरेश तांबोळी यांच्या हस्ते श्री. गोविंद रामभाऊ खापरे यांना सदर तीन चाकी सायकल प्रदान करण्यात आली. गरजू ज्येष्ठ नागरिकाला दैनंदिन जीवनात अधिक स्वावलंबीपणे वावरता यावे, या सामाजिक भावनेतून करण्यात आलेल्या या मदतीचे उपस्थितांनी कौतुक केले.

यावेळी डॉ. सुचित तांबोळी यांनी ज्येष्ठ नागरिकांसाठी आधार आपुलकी फाउंडेशनच्या माध्यमातून सुरू असलेल्या विविध सामाजिक उपक्रमांचे कौतुक केले. फाउंडेशनच्या सेवाभावी कार्याला भविष्यातही आपले कायम सहकार्य राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली. सामाजिक कार्यात सातत्य ठेवून गरजू व्यक्तींच्या जीवनात आधार निर्माण करण्याचे काम फाउंडेशनकडून सुरू असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

या उपक्रमास आधार आपुलकी फाउंडेशनचे सर्व कोअर सभासद तसेच आनंद योग सेंटरचे सर्व सन्माननीय सभासद उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी आधार आपुलकी फाउंडेशनचे संस्थापक श्री. शुभम पोपळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## गांधीनगरमध्ये डेंग्यूमुक्त अहिल्यानगर अभियानांतर्गत जनजागृती

### ९ हजार घरांना भेटी; २८ हजार पाणीसाठ्यांची तपासणी, २७० ठिकाणी डेंग्यूच्या अळ्या आढळल्या

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** अहिल्यानगर महानगरपालिकेच्या ‘डेंग्यूमुक्त अहिल्यानगर’ अभियानाच्या दहाव्या आठवड्यानिमित्त गांधीनगर परिसरात नागरिकांमध्ये डेंग्यू प्रतिबंधाबाबत जनजागृती तसेच पाणीसाठ्यांची तपासणी करण्यात आली. यावेळी कै. बाळासाहेब केशव ठाकरे मनपा शाळेतील विद्यार्थ्यांनी डेंग्यूविषयक जनजागृतीपर पथनाट्य सादर करून नागरिकांना स्वच्छता व डास प्रतिबंधाचा संदेश दिला. तसेच विविध स्पर्धांमधील विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिकांचे वितरण करण्यात आले.

यावेळी आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले की, कै. बाळासाहेब केशव ठाकरे मनपा शाळेत विद्यार्थ्यांना उत्कृष्ट शिक्षण दिले जात असल्यामुळेच विद्यार्थ्यांनी डेंग्यूमुक्त अभियानांतर्गत पथनाट्य, निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा आणि सांस्कृतिक कार्यक्रम प्रभावीपणे सादर केले. त्यामुळे या शाळेची गुणवत्ता कौतुकास्पद आहे. या शाळेत सर्वसामान्य कुटुंबातील तसेच कामगार वर्गातील विद्यार्थी शिक्षण घेत असून हीच पिढी उद्याच्या उज्ज्वल भारताचे भविष्य आहे.

शहरात डेंग्यूमुक्त अहिल्यानगर अभियानाचा दहावा आठवडा सुरू असून आतापर्यंत आशा व आरोग्य सेविकांच्या माध्यमातून ९ हजार घरांना भेटी देण्यात आल्या आहेत. २८ हजार पाणीसाठ्यांची तपासणी करण्यात आली असून त्यापैकी २७० पाणीसाठे दूषित आढळले. या ठिकाणी डेंग्यूच्या अळ्या निदर्शनास आल्यानंतर तातडीने संबंधित पाणीसाठ्यांवर उपाययोजना करण्यात आल्या. धूर व औषध फवारणी करून पाण्यात अबेट औषध टाकण्यात आले. परिसरातील नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी करून औषधोपचारही करण्यात आले.

आतापर्यंत शहरात डेंग्यूचे सहा रुग्ण आढळले आहेत. जनजागृतीच्या माध्यमातून सामाजिक कार्याची लोकचळवळ उभी राहत असून त्यावर उपाययोजना केल्या जात असल्यामुळे शहरातील डेंग्यूची रुणसंख्या कमी झाली असल्याचे आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले.

स्थायी समितीचे माजी सभापती कुमारसिंह वाकळे म्हणाले की, महापालिका आरोग्य विभागाच्या माध्यमातून शासनाच्या आरोग्य सुविधा प्रभागातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्याचे काम डॉक्टर, आरोग्य सेविका आणि आशा सेविका करत आहेत. पावसाळा सुरू झाल्यानंतर साथीचे आजार पसरण्याची शक्यता वाढते. हे आजार आटोक्यात आणण्यासाठी नागरिकांची भूमिका महत्त्वाची आहे.

नागरिकांनी आपला परिसर स्वच्छ ठेवण्याची खबरदारी घ्यावी. आठवड्यातून एकदा घरातील तसेच परिसरातील पाणीसाठ्यांची तपासणी करून ते स्वच्छ ठेवावेत आणि ‘एक दिवस कोरडा’ पाळावा, असे आवाहन त्यांनी केले.

अधिकारी चांगले असतील तर योजना नागरिकांच्या घरापर्यंत पोहोचतात. माझ्या प्रभागातील महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी चांगल्या पद्धतीने काम करत आहेत. मनपाच्या आरोग्य सुविधा मोफत असून नागरिकांनी त्याचा लाभ घ्यावा. सरकारी औषधे चांगली असतात. वेळेवर आजाराचे निदान करून उपचार घेतल्यास आरोग्य निरोगी ठेवता येते. नागरिकांनी विनाकारण खासगी रुग्णालयात जाऊन आर्थिक नुकसान करून घेऊ नये, असेही वाकळे यांनी सांगितले.

कै. बाळासाहेब केशव ठाकरे मनपा शाळेतील विद्यार्थी गुणवंत असून त्यांना घडविण्याचे काम शिक्षक करत आहेत. महापालिकेच्या माध्यमातून सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण मिळत असल्याचा अभिमान असल्याचेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमादरम्यान कै. बाळासाहेब केशव ठाकरे मनपा शाळेतील विद्यार्थ्यांनी डेंग्यू प्रतिबंधाविषयी जनजागृतीपर पथनाट्य सादर केले. तसेच निबंध, वक्तृत्व आणि इतर विविध स्पर्धांमध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिकांचे वितरण करण्यात आले.

यानंतर मनपा अधिकारी व आरोग्य पथकाने नागरिकांच्या घरोघरी जाऊन पाणीसाठ्यांची तपासणी केली. सुरू असलेल्या बांधकामाच्या ठिकाणी पाणीसाठ्याची तपासणी केली असता डेंग्यूसदृश्य अळ्या आढळून आल्या. संबंधित पाणीसाठे नष्ट करण्यात आले तसेच परिसरात धूर फवारणी करण्यात आली.

## मतांसाठी दारोदारी; आता समाजासाठी वेळ नाही?

### खासदार कल्याण काळेंविरोधात पैठणच्या मुस्लिम समाजात नाराजी; सुख–दुःखाच्या प्रसंगीही भेट नसल्याची नागरिकांची खंत

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**पैठण–** लोकसभा निवडणुकीत मोठ्या आशेने मतदान करणाऱ्या पैठण शहरातील मुस्लिम समाजात आता खासदार डॉ. कल्याण काळे यांच्या कार्यपद्धतीबाबत नाराजीचे सूर उमटू लागले आहेत. निवडून आल्यानंतर मुस्लिम समाजातील लग्नसमारंभ, सामाजिक कार्यक्रम अथवा दुःखद प्रसंगी सांत्वन करण्यासाठी खासदारांनी मुस्लिम मोहल्ल्यात अपेक्षित संपर्क ठेवला नसल्याची तक्रार समाजातील काही नागरिकांनी व्यक्त केली आहे. लोकसभा निवडणुकीपूर्वी मतदारांशी संपर्क साधण्यासाठी राजकीय नेते आणि कार्यकर्त्यांची लगबग असते. मात्र, निवडणूक संपल्यानंतर त्याच मतदारांना भेटण्यासाठी वेळ मिळत नाही, अशी भावना आता पैठणमधील काही मुस्लिम नागरिक व्यक्त करीत आहेत. ‘मतदानाच्या वेळी आम्ही महत्त्वाचे होतो; मग निवडून आल्यानंतर आमची विचारपूस का नाही?’ असा सवालही नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. पैठण शहरातील मुस्लिम समाजाने निवडणुकीत मोठ्या अपेक्षेने काळे यांच्या पाठीशी उभे राहिल्याचे सांगितले जाते. त्यामुळे खासदारांकडून समाजातील नागरिकांच्या अडचणी, मूलभूत प्रश्न आणि सामाजिक उपक्रमांकडे लक्ष दिले जाईल, अशी अपेक्षा होती. मात्र, प्रत्यक्षात नियमित संपर्काचा अभाव जाणवत असल्याची खंत नागरिक व्यक्त करीत आहेत.

**राजकीय सोबत बदलली; समाज मात्र प्रतीक्षेत?**

निवडणुकीच्या काळात खासदारांसोबत सक्रियपणे फिरणारे काही स्थानिक राजकीय चेहरे आता वेगवेगळ्या पक्षांच्या प्रवाहात गेल्याची चर्चा आहे. काहींना राजकीय पदे मिळाल्याने ते समाधानी असले तरी ज्यांनी मतदारांना एकत्र आणले, त्या सामान्य नागरिकांचे प्रश्न कोण ऐकणार? असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. पैठणमधील मुस्लिम समाजाच्या प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी खासदारांनी थेट समाजातील नागरिकांशी संवाद साधावा, सुख–दुःखात सहभागी व्हावे आणि मतदारसंघातील अपेक्षा जाणून घ्याव्यात, अशी मागणीही पुढे येत आहे.

**‘आता गाफील राहणार नाही’**

दरम्यान, आगामी काळात केवळ राजकीय आश्वासनांवर अवलंबून न राहता समाजाची स्वतंत्र भूमिका निश्चित करण्याबाबत चर्चा सुरू असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. आगामी राजकीय भूमिका घेताना उमेदवाराचा प्रत्यक्ष संपर्क, सामाजिक सहभाग आणि जनतेच्या प्रश्नांवरील भूमिका यांचा गांभीर्याने विचार केला जाईल, अशी भावना मुस्लिम समाजातील काही नागरिकांनी व्यक्त केली. निवडणुकीनंतर मतदारांपासून दूर राहणाऱ्या लोकप्रतिनिधींना जाब विचारण्याची वेळ आली आहे, अशी भावना आता पैठणच्या मुस्लिम समाजातील काही घटकांकडून व्यक्त होत असून, आगामी काळात या नाराजीचे पडसाद राजकीय पातळीवर उमटण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## ऊसाची थकीत बिले ७ ऑक्टोबरपर्यंत शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होणार

### लेखी आश्वासन मिळाल्यानंतर स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उपोषण मागे

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पैठण–** संत एकनाथ सहकारी साखर कारखान्यावर थकीत ऊस बिलाच्या रकमेच्या मागणीसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने सुरू करण्यात आलेले आमरण उपोषण शुक्रवारी लेखी आश्वासनानंतर मागे घेण्यात आले. कारखान्याचे साखर सहसंचालक जाधव यांनी शेतकऱ्यांना ७ ऑक्टोबरपर्यंत थकीत ऊस बिलाची रक्कम त्यांच्या बँक खात्यावर जमा करण्याचे लेखी आश्वासन दिले.

सविन घायाळ शुगर प्रायव्हेट लिमिटेडकडून मागील गाळप हंगामातील ऊस बिलाची रक्कम अद्याप अदा करण्यात आलेली नाही. त्यामुळे संतप्त ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या बॅनरखाली आंदोलन सुरू केले होते. गुरुवारी कारखान्याच्या प्रवेशद्वारासमोर शेतकऱ्यांनी आमरण उपोषण सुरू केले होते.

उपोषणाकडे दुर्लक्ष होत असल्याने नाराज शेतकऱ्यांनी काही काळासाठी कारखान्याचे कामकाजही बंद पाडले. त्यानंतर साखर सहसंचालक जाधव यांनी मध्यस्थी करून थकीत बिलाची रक्कम ७ ऑक्टोबरपर्यंत शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्याचे लेखी आश्वासन दिले. त्यानंतर शेतकऱ्यांनी उपोषण मागे घेतले.

यावेळी कारखान्याचे चेअरमन गणेश घायाळ, अमोल घायाळ तसेच स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे पदाधिकारी , छावा क्रांतिवीर सेनेचे प्रदेश महासचिव अनिल पाटील राऊत, साईनाथ कर्डिले, पवन शिरसाट, विष्णू बोडखे, सुभाष नवथर, ज्ञानेश्वर उगले, सतीश हस्के, पवन सिसोदे, रमेश गजरे, विशाल जाधव आदी उपस्थित होते.

# मेरी आवाज ही पहचान है'ची 'जरा हटके' संकल्पना यशस्वी

**लतादीदींसह आशा भोसले, सुमन कल्याणपूर आणि सुवर्णकाळ गाजवलेल्या गायिकांना अनोखी स्वरांजली । वर्षा पंडित, चंद्रशेखर महामुनी यांच्या सुरांनी रंगली सुरेल मैफल**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** श्री गुरुमाऊली संगीत विद्यालयाच्या वतीने आयोजित करण्यात आलेला 'मेरी आवाज ही पहचान है' हा गीतांचा कार्यक्रम यंदा नेहमीपेक्षा जरा हटके संकल्पनेतून साकारण्यात आला. भारतरत्न लता मंगेशकर यांना समर्पित करण्यात येणाऱ्या या कार्यक्रमात यंदा लतादीदींसोबतच त्यांच्या समकालीन काळाला आपल्या आवाजाने समृद्ध करणाऱ्या आशा भोसले आणि सुमन कल्याणपूर यांचेही स्मरण करण्यात आले. याचबरोबर हिंदी चित्रपटसृष्टीच्या सुवर्णकाळात आपल्या आवाजाने रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजविणाऱ्या विविध गायिकांना त्यांच्या अजरामर गीतांच्या माध्यमातून श्रद्धांजली वाहण्यात आली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी नगरचे प्रसिद्ध आरजे प्रसन्न पाठक यांनी आपल्या अनोख्या मिश्कील शैलीत प्रेक्षकांशी संवाद साधला. त्यांनी थेट प्रेक्षकांमध्ये फिरून त्यांच्या आवडीची गाणी प्रेक्षकांकडूनच गाऊन घेतली. त्यामुळे कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच रसिकांमध्ये उत्साहाचे आणि आपुलकीचे वातावरण निर्माण झाले.

मान्यवरांच्या आगमनानंतर मंचावर दीपप्रज्वलन आणि नटराज पूजन करण्यात आले. समाजासाठी सेवाभावी कार्यातून आदर्श निर्माण करून अहिल्यानगरमध्ये आपले वेगळे स्थान निर्माण करणारे राजेंद्रजी चोपडा, डॉ. नीरज करंदीकर, कमलेश भंडारी आणि गौतम मुनोत यांचा त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते शाल, सन्मानचिन्ह, पुष्पगुच्छ, मोतीमाळ आणि मानपत्र देऊन गौरव करण्यात आला.

यावेळी मंचावर प्रा. शरद कोलते, चिन्मय सुखटनकर, डॉ. दामण काशीद, अशोक गांधी जरीवाला, ॲड. जयंत भापकर, हेमचंद्र इंगळे, हेमंत नेवासकर, शाम रेणाविकर, गजेंद्र कुलकर्णी, डॉ. सागर कड, डॉ. हेमंत नाईक, रवींद्र बक्षी, जनकशेट आहुजा, निर्मल खंडेलवाल, धनेश बोगावत, वसंत बोरा, ॲड. प्रमोद मेहेर, पद्माकर वांजळे आदी मान्यवर उपस्थित होते. यानंतर कार्यक्रमातील सर्व कलाकारांचाही सत्कार करण्यात आला.

विद्यालयाच्या प्रथेप्रमाणे नृत्य विभागाच्या ईश्वरी काळे, आस्था पिंगळीकर, दर्शना दंडवते, गौरी साठ्ये, ध्रुवी पोटे आणि सृष्टी गंधे या विद्यार्थिनींनी गणेशवंदना नृत्य सादर करून कार्यक्रमाची सांगीतिक सुरुवात केली.

यानंतर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसन्न पाठक यांनी पुण्याचे सुप्रसिद्ध निवेदक डॉ. प्रसादजी पिंपळखरे यांच्याकडे सोपविले. आपल्या अभ्यासपूर्ण आणि ओघवत्या शैलीत डॉ. पिंपळखरे यांनी कार्यक्रमाला सुरुवात करून दिली. लतादीदींच्या 'कुछ दिल ने कहा' या गीताने मैफलीची सुरेल सुरुवात झाली. त्यानंतर विद्यालयाच्या संचालिका आणि नृत्य तपस्वी सौ. वर्षा पंडित यांनी चाळीस ते ऐंशीच्या दशकातील विविध गायिकांनी आपल्या आवाजाने अजरामर केलेली एकापेक्षा एक सरस गीते सादर केली.

दमदार आणि किंचित अनुनासिक आवाजाने एक काळ गाजविणाऱ्या शमशाद बेगम, नूरजहाँ, राजकुमारी, उमादेवी, जगजीत कौर तसेच सीमेपलीकडून आलेल्या सलमा आगा यांच्या गीतांपासून ते आपल्या गोड आणि सुरेल आवाजाने रसिकांना भुरळ घालणाऱ्या सुरैया, गीता दत्त, मुबारक बेगम आणि नंतरच्या काळातील हेमलता यांच्या गीतांनी रसिक मंत्रमुग्ध झाले.

काळाच्या पुढे असणाऱ्या आणि आपल्या आयुष्यातील सत्तरपेक्षा अधिक वर्षे विविध भाषांमध्ये गायन करणाऱ्या आशा भोसले आणि सुमन कल्याणपूर यांच्या जुन्या काळातील अवीट गाण्यांचा आस्वाद घेताना रसिक अक्षरशः त्या काळात हरवून गेले. वेगवेगळ्या रंगांच्या आणि आल्हाददायी गंधाच्या फुलांनी सजविलेल्या गुच्छाप्रमाणे हा कार्यक्रम वर्षा पंडित तसेच पुण्याहून आलेले सुप्रसिद्ध गायक चंद्रशेखर महामुनी यांच्या स्वरांनी उत्तरोत्तर रंगत गेला. पडद्याआड गेले असले तरी आपल्या आवाजामुळे अजरामर झालेल्या मुकेश, मोहम्मद रफी, किशोर कुमार, तलत महमूद, शामसुंदर चड्ढा आणि सुरेंद्र यांनी गायलेली युगलगीतेही रसिकांना विशेष भावली. प्रेक्षकांनी ऐनवेळी केलेल्या खास फर्माईशीनुसार चंद्रशेखर महामुनी यांनी सादर केलेल्या 'खोया खोया चाँद' या गीताने कार्यक्रमाला विशेष रंगत आणली.

# वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धन ही आगामी काळाची गरज – आमदार संग्राम जगताप

**ऐसा व पोलाद स्टीलच्या सहकार्याने ओंकार कॉलनीत वृक्षारोपण; आमदार जगताप यांचा विशेष सत्कार**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** पृथ्वीवरील तापमान दिवसेंदिवस वाढत असून पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षारोपणाबरोबरच वृक्षसंवर्धन करणे ही आगामी काळाची गरज आहे. प्रत्येकाने किमान पाच रोपे लावून त्यांचे संगोपन करण्याचा संकल्प करावा, असे आवाहन आमदार संग्राम जगताप यांनी केले.

आर्किटेक्ट्स, इंजिनिअर्स अँड सर्व्हेयर्स असोसिएशन अहिल्यानगर यांच्या वतीने माजी अध्यक्ष मकरंद देशपांडे आणि पोलाद स्टील यांच्या सहकार्याने ओंकार कॉलनी, नागापूर परिसरात वृक्षारोपण व वृक्षसंवर्धनाचा संदेश देणारा उपक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी आमदार संग्राम जगताप यांचा विशेष सत्कारही करण्यात आला.

यावेळी बोलताना आमदार संग्राम जगताप म्हणाले की, पृथ्वीवरील तापमान सातत्याने वाढत आहे. त्यामुळे वृक्षारोपण करणे ही आता केवळ सामाजिक जबाबदारी नसून काळाची गरज झाली आहे. मात्र झाडे लावण्याबरोबरच त्यांचे संवर्धन करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. वृक्षारोपण करताना त्या ठिकाणी विद्युत वाहिन्या किंवा लाईटच्या तारा आहेत का, झाडांमुळे रस्ते, गटार किंवा इतर सुविधांना अडथळा निर्माण होणार नाही ना, याची काळजी घेणे आवश्यक आहे. लावलेल्या रोपांचे संरक्षण करण्यासाठी ट्री गार्डची व्यवस्था करणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रास्ताविक करताना ऐसा चे माजी अध्यक्ष मकरंद देशपांडे यांनी त्यांच्या ले-आऊटमध्ये विविध ठिकाणी केवळ वृक्षारोपण न करता रोपांच्या संरक्षणासाठी ट्री गार्ड लावून त्यांचे संगोपन करण्याचे काम केले असल्याचे सांगितले.

आमदार संग्राम जगताप यांनी संस्थेच्या विविध उपक्रमांना वेळोवेळी सहकार्य केले आहे. कल्याण रोडवरील ऐसा सिटीमधील ओपन स्पेस डेव्हलपमेंटसाठी कंपाउंड आणि स्टेज अंतर्गत सजावटीच्या कामासाठी आमदार निधीतून मोठी मदत मिळाली आहे. या सहकार्याबद्दल संस्थेच्या वतीने आमदार संग्राम जगताप यांचा सन्मान करण्यात येत असल्याचे देशपांडे यांनी नमूद केले.

महापौर ज्योती गाडे यांनी वृक्षसंवर्धनाचे महत्त्व विशद करत शहर हिरवेगार करण्यासाठी सर्व नगरकरांनी सहकार्य करण्याचे आवाहन केले. शहरातील हरित क्षेत्र वाढविण्यासाठी महानगरपालिकेच्या माध्यमातून विशेष काम करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

उपमहापौर धनंजय जाधव यांनी अहिल्यानगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आगामी वर्षात एक लाख वृक्षारोपण करून त्यांचे संवर्धन करण्याचे जाहीर केले होते. त्यानुसार आतापर्यंत दहा हजारांपेक्षा अधिक झाडे लावण्यात आली असून त्यांचे संवर्धनही करण्यात येत आहे, अशी माहिती त्यांनी दिली.

नगरसेवक कुमार वाकळे यांनी आपल्या वॉर्डमध्ये वृक्षारोपण करताना केवळ फळझाडे आणि फुलझाडे न लावता काही जंगली तसेच यापूर्वी परिसरात न पाहिलेल्या विविध प्रकारच्या झाडांची लागवड करण्यात आल्याचे सांगितले.

ऐसाचे अध्यक्ष इंजि. प्रदीप तांदळे यांनी संस्थेच्या विविध उपक्रमांची माहिती देताना मकरंद देशपांडे आणि मयूर देशपांडे यांच्या विशेष प्रयत्नातून हा भव्य वृक्षारोपण उपक्रम पार पडल्याचे सांगितले. पोलाद स्टीलच्या सहकार्याने 'नॉलेज सिरीज' अंतर्गत ही मोहीम राबविण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले.

संस्थेने यापूर्वी अनिल मुरकुटे, मकरंद देशपांडे, कै. श्रीनिवास कनोरे, सुरेश परदेशी, मनोज जाधव आणि सलीम शेख यांच्या सहकार्याने वृक्षारोपण तसेच जलपुनर्भरणाचे उपक्रम राबविले आहेत. पर्यावरण संवर्धनाच्या या उपक्रमांना आमदार संग्राम जगताप यांचा वेळोवेळी मिळणारा पाठिंबा मोलाचा असल्याचे तांदळे यांनी सांगितले.

# शेवगावच्या पाणीटंचाईवर तातडीच्या उपाययोजनांची मागणी

**अरुण मुंढे यांनी पालकमंत्री विखे पाटील यांना दिले निवेदन**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**शेवगाव–** शेवगाव शहरातील वाढत्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर शिवसेना नेते अरुण मुंढे यांनी जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री मा. ना. राधाकृष्ण विखे पाटील यांची भेट घेऊन शहराच्या पाणीपुरवठ्याबाबत सविस्तर निवेदन दिले. लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय, आखेगाव रोड येथे झालेल्या टंचाई आढावा बैठकीदरम्यान हे निवेदन देण्यात आले.

शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या जुन्या योजनेतील चारही पंपांची डिझाईन लाईफ पूर्ण झाली असून, वारंवार दुरुस्ती करूनही त्यांच्या कार्यक्षमतेवर परिणाम झाला आहे. परिणामी पंपांचा अपेक्षित डिस्चार्ज २.५ लाख लिटरपेक्षा अधिक असताना सध्या तो सुमारे १.५ लाख लिटरपर्यंत घसरला आहे.

या चारही पंपांच्या नूतनीकरणासाठी अंदाजे एक कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून, दोन्ही नगरपरिषदांनी प्रत्येकी ५० लाख रुपये थकीत पाणीपट्टीमधून भरण्याचे नियोजन करण्यात आले होते. त्यानुसार शेवगाव नगरपरिषदेने ५० लाख रुपये भरले आहेत. मात्र, पाथर्डी नगरपरिषदेची रक्कम अद्याप जमा न झाल्याने नवीन पंप बसविण्याच्या प्रक्रियेला विलंब होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले.

पंपांची अपुरी क्षमता आणि दुष्काळजन्य परिस्थितीमुळे सध्या शेवगाव शहरात १६ ते १७ दिवसांच्या अंतराने पाणीपुरवठा होत आहे. तसेच शहरातील विविध वाड्या–वस्त्यांमधील बोअरवेल व विहिरींचे पाणी आटल्याने नागरिकांची पाण्यासाठी मोठी गैरसोय होत आहे. या पार्श्वभूमीवर नवीन पंप तातडीने उपलब्ध करून देण्यास गती द्यावी तसेच पाणीटंचाईग्रस्त वाड्या–वस्त्यांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यासाठी आवश्यक मंजुरी द्यावी, अशी मागणी अरुण मुंढे यांनी केली. शेवगाव शहरातील नागरिकांना नियमित व पुरेसा पाणीपुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी शासन व प्रशासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

# इतिहासाचा अभ्यास करायला हवा त्यातून स्वबोध झाला की देश आपोआप विश्वगुरू होईल – प.पू. स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज

**ज्ञानसंपदा शाळेच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त शाळेसाठी विविध आधुनिक सुविधाचे उदघाटन**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** जीवनात आपल्याला स्वबोध झाला पाहीजे, आपण कोण आहोत याची जाणीव झाली पाहिजे व त्यातूनच आत्मविश्वास जागवला जाईल यासाठी आम्ही आमच्या इतिहासाचा अभ्यास करायला हवा देश आपोआप विश्वगुरू होईल असे प्रतिपादन अयोध्येच्या श्रीराम जन्मभूमी न्यासाचे महासचिव प.पू. स्वामी गोविंददेव गिरी महाराज यांनी केले.

तपोवन रोडवरील संपदा विद्या प्रतिष्ठानच्या ज्ञानसंपदा शाळेच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त शाळेसाठी विविध आधुनिक सुविधाचे उदघाटन अयोध्येच्या श्रीराम जन्मभूमी न्यासाचे महासचिव प.पू. स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज यांच्या हस्ते झाले यावेळी त्यांनी 'विश्वगुरू भारत घडविणारी भावी पिढी' या विषयावर विद्यार्थ्यांशी संवाद साधला. संपदा विद्या प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रवीण बजाज ,उपाध्यक्ष मिलिंद गंधे, स्कूल कमिटी चेअरमन कारभारी भिंगारे, मानद सचिव अरुणजी कुलकर्णी, खजिनदार अविनाश बोपर्डीकर, विश्वस्त श्रीहरी टिपूगुडे, बजाज पॉवर लिमिटेडचे विनोद बजाज, दिनेशजी अग्रवाल , अशोकजी गोकुळदास गांधी आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी बजाज पॉवर लिमिटेडचे विनोद बजाज यांच्या सहकार्याने सुसज्ज सभागृह, तर श्रीजी इंडस्ट्रीजचे दिनेशजी अग्रवाल यांच्या सहकार्याने संगणक प्रयोगशाळा तसेच अशोकजी गोकुळदास गांधी यांच्या सहकार्याने इंटरॅक्टिव्ह पॅनल उपलब्ध करून देण्यात आले.

प.पू. स्वामी गोविंददेव गिरी महाराज म्हणाले आपला भारत विश्वगुरू पदी आधीपासून विराजमान होता हे आपण आज विसरलो आहोत. आजही सगळं जग या देशाकडे मोठया आशेने पाहत आहे.कारण आपल्याला आजवर शिकवण्यात आले की, हा अडाण्यांचा देश होता. या देशात संस्कृती नव्हती, शिक्षणाची ज्योत तर इंग्रजांनी पेटवली. मात्र हे जे कोणी सांगते ते एकतर मूर्ख आहेत अथवा ते तुम्हाला फसवत आहेत.इंग्रजांनी आपल्या शिकवले नाही तर आपला आत्मविश्वास घालवून टाकण्याकरीता दिशाभूल करणारे शिक्षण दिले. कुणालाही गुलाम करायचे असल्यास त्याच्या इतिहासाचे विस्मरण व त्याचा आत्मविश्वास मारायचा हे तत्व त्यांनी अवलंबले. आपला देश तोडण्याचा फार मोठा आंतरराष्ट्रीय डाव अनेक वर्षांपासून चालू आहे.विश्वगुरूत्वाच्या पदावर कोणत्या देशाला बसवायचे असेल तर पहिल्यांदा आपल्या देशाचा मागोवा घेउन स्वबोध ओळखता आला पाहीजे. आपल्या मनात शौयाची भावना छत्रपती शिवाजी महाराज, बाजीप्रभु देशपांडे यासारख्या चे स्मरण होते आज त्यांना आपण विसरलो तर शौर्य संपून जाईल. आपल्या देशाचा गौरवमय इतिहास जाणून घेणे म्हणून गरजेचे आहे. जेनझी, अल्फा सारखे टुकार शब्द आणले आहेत ते खोटे आणि काल्पनिक शब्द आहेत त्यामुळे आपल्या आई–वडील भाऊ–बहीण या जवळच्या नात्यात व प्रत्येकाच्या मनात संशयाचे वातावरण निर्माण होईल अशी व्यवस्था केली जात आहे. घराला पण इतिहास असतो मी त्या घरातील आहे प्रत्येकाशी माझा संवाद पाहीजे संवादाकरीता एकत्र बसून विचार व भावनाचे देवाण–घेवाण करता आली पाहीजे ज्याप्रमाणे घरात संवाद पाहीजे त्याप्रमाणे समाजात संवाद पाहीजे.

# आजी–आजोबा, शिक्षक व विद्यार्थ्यांचा सुसंवाद; ज्येष्ठ नागरिक दिन उत्साहात साजरा



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जनता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित काकासाहेब म्हस्के विद्यालय, नागापूर, अहिल्यानगर येथे ज्येष्ठ नागरिकांच्या कल्याणासाठी उपाययोजना उपक्रमांतर्गत जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त 'आजी–आजोबा, शिक्षक व विद्यार्थी सुसंवाद कार्यक्रम' उत्साहात आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. सुनंदा धामणे तर प्रमुख अतिथी म्हणून माध्यमिक विद्यालयाच्या प्राचार्या सौ. शितल बांगर उपस्थित होत्या. या उपक्रमात विद्यालयातील विद्यार्थी, त्यांचे आजी–आजोबा, ज्येष्ठ नागरिक, शिक्षक व पालक यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. 'आजी–आजोबा, शिक्षक व विद्यार्थी' या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या सुसंवाद बैठकीमध्ये ज्येष्ठ नागरिकांचे जीवनातील अनुभव, संस्कार, कुटुंबातील त्यांचे महत्त्वाचे स्थान, विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत त्यांचे योगदान तसेच विविध पिढ्यांमधील सुसंवाद या विषयांवर विचारांची देवाण–घेवाण करण्यात आली. ज्येष्ठ नागरिक हे कुटुंबाचे अनुभवाचे आणि संस्कारांचे भांडार असून, त्यांच्या सहवासातून विद्यार्थ्यांना जीवनमूल्ये, संस्कार व सामाजिक जाणिवा प्राप्त होतात, याबाबत कार्यक्रमात मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनीही आपल्या आजी–आजोबांशी असलेले नाते, त्यांच्याकडून मिळणारे संस्कार व अनुभव याविषयी मनोगत व्यक्त केले. या संवादातून पिढ्यांमधील भावनिक नाते अधिक दृढ करण्याचा संदेश देण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना ज्येष्ठ नागरिकांप्रती आदर, आपुलकी, संवेदनशीलता, सहकार्य आणि सामाजिक बांधिलकी जपण्याचे आवाहन करण्यात आले. विद्यालयाचे शिक्षक श्री. राजेंद्र पठारे यांनी विद्यार्थ्यांना ज्येष्ठ नागरिकांच्या प्रतिष्ठेचा आदर व त्यांच्या सन्मानाचे रक्षण करण्याबाबत शपथ दिली.

ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त ज्येष्ठ नागरिकांच्या मनोरंजनासाठी विद्यालयात संगीत खुर्ची स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. ज्येष्ठ नागरिकांनी या स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग घेत आनंद लुटला. या उपक्रमामुळे ज्येष्ठ नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यालयाच्या शिक्षिका सौ. अर्चना गाडेकर यांनी केले. यावेळी विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.कार्यक्रमाचे आयोजन विद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाने प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. सुनंदा धामणे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली केले. या उपक्रमातून ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान, त्यांच्या अनुभवांचा विद्यार्थ्यांच्या जीवनाशी संवाद आणि पिढ्यांमधील प्रेम, आपुलकी व समन्वयाचा संदेश प्रभावीपणे देण्यात आला.

(पान १ वरून)

## मान्सूनचा परतीचा प्रवास सुरू, राज्यावरील दुष्काळाचे संकट गडद

असल्याची घोषणा ही भारतीय हवामान केंद्राकडून करण्यात आलेली आहे आणि सोबतच पुढील दोन ते तीन दिवसात संपूर्ण राज्यातून हे मोसमी वारे माघारी परततील एकूणच परतीचा पाऊस हा कुठेतरी होईल, अनेक ठिकाणी पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे राज्यावरील दुष्काळाचे संकट अधिक गडद झाले आहे.

## ऑक्टोबर हीटचा तडाखा; अहिल्यानगरचा पारा ३५ अंशांवर

अंशाने वाढ होऊन पारा ३६ अंशांपर्यंत जाण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. ऑक्टोबरचा दुसरा आणि तिसरा आठवडा उष्णतेचा राहण्याची शक्यता असून, महिनाअखेरपर्यंत तापमान ३८ अंशांपर्यंत पोहोचू शकते.

तापमान वाढीचा पिकांवर परिणाम

कडक उन्हामुळे पिकांची अन्नद्रव्ये शोषण्याची गती मंदावते. त्यामुळे शेतकऱ्यांनी पिकांना ठिबक किंवा तुषार सिंचनाद्वारे हलके पाणी द्यावे. जमिनीतील ओलावा टिकवून ठेवण्यासाठी बाष्पीभवन रोखणाऱ्या आच्छादनाचा म्हणजेच मल्चिंगचा वापर करावा. दुपारच्या कडक उन्हात पिकांना पाणी देणे टाळून पहाटे किंवा संध्याकाळच्या वेळीच पाणी व्यवस्थापन करावे, असा सल्ला हवामानतज्ज्ञ बी. एन. शिंदे यांनी दिला आहे.

## मठ-मंदिरं ही हिंदूंची स्फूर्तीकेंद्र – प. पू.स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज

जीवन समर्पण केलेल्या शिवाजी महाराजांसोबत सावली सारखे रहाणारे मावळे सतत सतर्क असायचे. छत्रपती शिवाजी महाराजांनी शिताफीने मिळवलेले किल्ले, विश्वासू हेरांनी दिलेल्या माहिती आधारे आखलेल्या विविध योजना, आक्रमण होण्याची शक्यता गृहीत धरून केलेल्या व्यवस्था टिकवून ठेवण्यासाठीचे नियोजन, मोगलांशी तह करताना केलेली बोलणी, किल्ल्याला वेढा पडला असता शत्रूच्या हातावर तुरी देऊन पसार होण्याचे धाडस, औरंगजेबाची आर्थिक राजधानी असलेल्या सुरतेकडून केलेली वसुली, शत्रूला गाफील ठेवून केलेला गनिमी कावा या सर्व कार्यामधून कुलस्वामिनीची श्रध्दा, दृढ विश्वास, एकनिष्ठता, प्रामाणिकपणा, राष्ट्र आणि धर्म प्रेम, हिंदवी स्वराज्याची तळमळ, असामान्य धैर्य दिसून येते. आरमार म्हणजे नेव्ही उभी करण्याचे सर्वात मोठे पहिले कार्य शिवाजी महाराजांनी केले.

पन्हाळगड ते विशाळगड हे ४० मैलाचे अंतर २१ तासात पूर्ण करणारे मावळे आणि महाराज विशाळगडावर पोहोचेपर्यंत घोडखिंडीत सिद्दी जौहरच्या सैन्याला अडवून ठेवणारे बाजीप्रभू देशपांडे तसेच शिवरायांसाठी पालखीत बसणारे शिवा काशिद हे खरे धर्मवीर. हिंदू धर्म रक्षक. अशा वीरांची चरित्रे अंत:करणात कृतज्ञतेचा भाव ठेवून वाचायची–ऐकायची असतात. त्यांच्या जीवन कार्यामधून देव, देश आणि धर्म कार्याची प्रेरणा घ्यायची असते. या प्रेरणांमधून वर्तमान समस्यांना तोंड देण्याचे सामर्थ्य प्राप्त होते. बाजीप्रभू देशपांडे यांच्या हौतात्म्याने तीर्थत्व प्राप्त झालेल्या घोडखिंडीचे नामकरण शिवरायांनी पावनखिंड केले ते पुढील पिढीला स्वराज्याविषयी कायम स्फूर्ती मिळत राहो या सद् हेतूनेच, असे स्वामी गोविंददेव गिरीजी महाराजांनी सांगितले. यावेळी सर्वश्री दत्ता जाधव, किरण मणियार, हिरालाल पटेल, विनोद पटेल, बाली जोशी, राजूभाई पटेल, गोपाल मणियार, रविंद्र गुजराथी, प्रदिप पंजाबी, बजरंग दरक, विजय पंजाबी, राजेंद्र खंडेलवाल, राहुल जामगांवकर, हर्षल शहा, पंकज पटेल, मुकुंद जाजू, हर्षा गुजराथी आदी मान्यवरांसह

शहरातील आणि उपनगरातील हिंदू धर्म प्रेमी मोठ्या संख्येने कार्यक्रमास उपस्थित होते. ज्येष्ठांसह महिलांची उपस्थिती लक्षणीय होती.